# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/०३/२०२५ ( गुरूवार ) दुपार**

---

### फिर्यादीला व्हॉटस्‌ॲप द्वारे कॉल करून टेलीकॉम डिपार्टमेंट आणि मुंबई पोलीस बोलत असल्याचे सांगुन फिर्यादीची आर्थिक फसवणुक करणाऱ्या आरोपीला अटक सावनेर पोलीसांची कारवाई

फिर्यादी नामे दिलीप धनराज धोटे, वय ५५ वर्षे, रा. बोरगाव (बु.), पोस्ट आदासा, ता. कळमेश्वर यांनी पोलीस स्टेशन सावनेर येथे तोंडी रिपोर्ट दिली की, दिनांक २६/११/२०२४ चे ०३.१४ वा ते दि. ०३/०१/२०२४ चे १०.०० वा. दरम्यान आरोपी व्हॉटस्‌ॲप अकाउंट मोबाईल क्रमांक ८९४५३५००३१ चा धारक याने टेलीकॉम डिपार्टमेन्ट मधुन बोलत असल्याचे सांगुन फिर्यादीला त्यांच्या आधारकार्डचा गैरवापर करून त्यावरून बॅक खाते उघडुन त्या बॅक अकाउंटचा मनी लॉन्ड्रींग करीता वापर झाल्याचे सांगीतले.त्यांनतर आरोपी व्हॉटस्‌ॲप मोबाईल क्रमांक ८१७३८३६८१२ चा धारकाने फोन करून सब इन्सपेक्टर हेमराज कोली, मुंबई पोलीस असल्याचे सांगुन बॅकेतील अमाउंट व्हेरिफाय करायची असुन अमाउंट व्हेरिफाय होताच परत करण्यात येईल असे बोलुन फिर्यादीला दिनांक २७/११/२०२४ रोजी आरटीजीएस व्दारे येस बॅक खाते क्र. ००८८६१९००००८१७२ खाते धारक – राधे ट्रेडींग कंपनी या खात्यात **११,०९,७८८/– रूपये** आणि दिनांक २८/११/२०२४ रोजी बंधन बॅक खाते क्र.– २०१०००३२५५८५३२ खाते धारक– के. आर. एस. ग्लोबल इन्टरप्राईजेस या खात्यात **१०,००,०००/– रूपये** असे एकुण **२१,०९,७८८/– रूपये** पाठवीण्यास सांगुन फिर्यादीची आर्थीक फसवणुक केलेली असल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून अप. क्र. २६१/२५ कलम ३१७(४), ३१८, ३१९ बि.एन.एस. सहकलम– ६६(ड) माहीती तंत्रज्ञान अधिनीयम २००० अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

गुन्हयाचे तपासात फिर्यादीची फसवणुक झालेल्या एकुण रकमे पैकी १०,००,०००/– रूपये (दहा लाख रूपये) बंधन बॅक खाते क्र. २०१००३२५५८५३२, अकाउंट खाते धारक –के.आर.एस. ग्लोबल इन्टरप्रायजेस मालक – कोता राजशेकर पिता कोता श्रीरामुलु, पत्ता –२–११८/१, डाबीलपुर, पोस्ट डाबीलपुर, जिल्हा मेडचल

मलकाजगिरी याचे बॅक खात्यामधे जमा होउन ती रक्कम इतर बॅक खात्यांमधे वळते केल्याचे व त्यानंतर जयपुर राजस्थान येथुन ए.टी.एम. व्दारे विड्रोल केल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी कोता राजशेकर पिता कोता श्रीरामुलु, पत्ता — २—११८/१, डाबीलपुर, पोस्ट डाबीलपुर, जिल्हा मेडचल मलकाजगिरी, राज्य तेलंगाना यास दिनांक २५/०३/२०२५ चे २१.१६ वा. अटक करण्यात आली. आरोपीस दिनांक २६/०३/२०२५ रोजी मा. प्रथम वर्ग न्यायाधीश, सावनेर यांच्या समक्ष पेश केले असता मा. न्यायालयाने आरोपीचा दिनांक २८/०३/२०२५ पर्यंत ३ दिवस पि.सी.आर. मंजुर केला.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**